सकाळ



अर्जुननगर : निवड झालेले देवचंद कॉलेजचे विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक.

# 'देवचंद'च्या चार विद्यार्थ्यांची निवड

**नानीबाई चिखली :** अर्जुननगर (ता. कागल) येथील देवचंद कॉलेज आणि क्विक हील फाउंडेशन, पुणे यांच्यात सामंजस्य करार झाला. करारांतर्गत संगणकशास्त्र विभागातील चार विद्यार्थ्यांची क्विक हील फाउंडेशन, पुणेतर्फे क्लब ऑफिसर म्हणून निवड झाली. निवड झालेले विद्यार्थी 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमात सहभागी होणार आहेत. संगणकशास्त्र विभागातील रुद्र सुतार,ज्योती भोंगाळे, मधुरा पुंडे, प्रतीक्षा नाईक आणि समन्वयक म्हणून प्रा. प्रशांत कुंभार यांच्यावर या उपक्रमाचे नेतृत्व सोपविले आहे. अजय शिर्के, गायत्री केसकर-पवार आणि दिपू सिंग यांनी मार्गदर्शन केले. कंपनीच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांनी मार्गदर्शन केले. चार विद्यार्थी व १६ सायबर वॉरियर्स महाविद्यालय परिसरातील शाळा तसेच विविध घटकांना सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करणार आहेत. प्रभारी प्राचार्य डॉ.आर. एम. साळुंखे, संगणकशास्त्र विभाग प्रमुख स्वप्नील पोतदार यांचे मार्गदर्शन मिळाले.

Kolhapur, Kolhapur-Today
12/07/2026 Page No. 4